# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १६३-२२ दिनांक - ०६/०६/२०२२

## घरगुती हुक्का पार्लरवर अंमली पदार्थ विरोधी कक्ष व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर पथकाची संयुक्त कारवाई.

दिनांक ०४.०६.२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इसम नामे करण जोशी हा रुम मध्ये जी/०८ सिध्दार्थ को. ऑ. सोसायटी, भाईंदर पश्चिम हा गिऱ्हाईकांना तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देत असून हुक्का पुरवित आहे.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. देविदास हंडोरे यांनी वरिष्ठांना माहिती देवून पुर्तता करुन सदर ठिकाणी पंच व पोलीस पथकासह दिनांक ०४/०६/२०२२ रोजी २२.५५ वा. छापा टाकला असता सदर ठिकाणी कोणताही परवाना न घेता रुममध्ये १) करण भरत जोशी, याने नियोजन करुन त्याचेसोबत वेटर म्हणुन काम करणारे २) रॉकी राज शर्मा, ३) जिग्नेश विनोदभाई शहा, ४) बिल्ला सलीम अन्सारी, व ५) सुरज राजेश पुजारी यांचेसोबत वरील रुममध्ये ग्राहकांना तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देवुन सदर रुममध्ये हुक्का पुरवितांना मिळून आले. सदर कारवाई दरम्यान एकुण ७ ग्राहक तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का पित असताना मिळुन आले. तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत फ्लेवर व हुक्क्याचे साहित्य असा एकुण ११,२८३/- रुपयाचा मुद्देमालासह ताब्यात घेवुन वरील आरोपीतांविरुध्द पोहवा/अजय सपकाळ यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे येथे I गुन्हा रजि. नं. २८२/२०२२ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियम २००३ चे कलम ४ (क), २१ (क) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. देविदास हंडोर, सपोनि तेजश्री शिंदे-भरोसा सेल, पोहवा/धनाजी इंगळे, पी. डी. टक्के, ए. आर. सपकाळ, एस. ए. आव्हाड, पोशि. अे. बी. यादव, व पो. हवा. व्ही. ए. घरबुडे तसेच - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे सहापोउपनि/उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र एस. पाटील, पोशि/ केशव शिंदे यांनी संयुक्त कारवाई केली आहे.